दुरध्वनी – ०२० २६३६०९४१

आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे

२८, क्वीन्स गार्डन, जुने सर्किट हाऊस जवळ, पुणे- ४११००१

महाराष्ट्र शासन

E-mail:trti.mah@nic.in
Website: trti.maharashtra.gov.in

जा.क्र. आसंप्रसं/२०२५-२६/स्पर्धा परीक्षा/का- ०४/ ३६४५ दिनांक : ०६/०८/२५

## महत्त्वाची सूचना

### आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे मार्फत सन २०२५-२६ करिता GRE (Graduate Record Examination) / TOEFL (Test of English as a Foreign Language)/IELTS (International English Language Testing System)/ GMAT (Graduate Management Admission Test) पूर्व प्रशिक्षण कार्यक्रम आणि परकीय भाषा (फ्रेंच, जर्मन, स्पॅनिश, कोरीयन, रशियन व जॅपनीज) पूर्व प्रशिक्षण कार्यक्रम (अनिवासी) करिता पात्र उमेदवारांसाठी संस्था निवडीबाबतची विकल्प लिंक उपलब्ध करून देणेबाबत...

आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे मार्फत सन २०२५-२६ करिता अनुसूचित जमातीच्या लाभार्थ्यांकरिता राबविण्यात येणाऱ्या **GRE (Graduate Record Examination) / TOEFL (Test of English as a Foreign Language) / IELTS (International English Language Testing System)/ GMAT (Graduate Management Admission Test) पूर्व प्रशिक्षण कार्यक्रम आणि परकीय भाषांचे (फ्रेंच, जर्मन, स्पॅनिश, कोरीयन, रशियन व जॅपनीज)** पूर्व प्रशिक्षण कार्यक्रम (अनिवासी) करिता पात्र ठरलेल्या अनुसूचित जमातीच्या उमेदवारांना संबंधित प्रशिक्षण देणाऱ्या खाजगी नामांकित प्रशिक्षण संस्थेची निवड करण्यासाठी विकल्प देण्याची सुविधा आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्थेच्या संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात येत आहे.

सदर पूर्व प्रशिक्षण संस्थेची निवड करण्याकरिता ऑनलाइन विकल्प देण्याची लिंक आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्थेच्या संकेतस्थळावर दि. ०६.०८.२०२५ रोजी दुपारी १२.०० वाजेपासून ते दि. १८.०८.२०२५ रात्री ११:५९ वाजेपर्यंत या कालावधीकरिता उपलब्ध राहील. उमेदवारांना सदरच्या पूर्व प्रशिक्षण संस्थेची निवड करण्याकरिता ऑनलाइन विकल्प देण्याची लिंक उपरोक्त नमूद कालावधी पर्यंतच चालू राहील, याची सर्व उमेदवारांनी नोंद घ्यावी.

सदर प्रशिक्षण कार्यक्रमाअंतर्गत देय असलेले प्रशिक्षण शुल्क व प्रशिक्षणार्थींना देण्यात येणाऱ्या वैयक्तिक लाभाबाबतची सविस्तर माहिती खालील तक्त्यात नमूद करण्यात आली आहे.

| अ. क्र. | योजनेचे नाव | योजनेचा कालावधी | योजनेचे लाभार्थी | प्रस्तावित विद्यावेतन (प्रति माह), अनुषंगिक लाभ (एकवेळ) |
|---|---|---|---|---|
| १ | GRE (Graduate Record Examination) / TOEFL (Test of English as a Foreign Language)/IELTS (International English Language Testing System)/ GMAT (Graduate Management Admission Test) पूर्व प्रशिक्षण कार्यक्रम | ०६ महीने | ४०० | • विद्यावेतन – रु. १०,०००/- (प्रति महिना)<br>• अनुषंगिक लाभ – रु. १२,०००/- (फक्त एकदाच) |

| अ. क्र. | योजनेचे नाव | योजनेचा कालावधी | योजनेचे लाभार्थी | प्रस्तावित विद्यावेतन (प्रति माह), अनुषंगिक लाभ (एकवेळ) |
|---|---|---|---|---|
| २ | परकीय भाषांचे (फ्रेंच, जर्मन, स्पॅनिश, कोरीयन, रशियन व जॅपनीज) पूर्व प्रशिक्षण कार्यक्रम | ०६ महीने | १०० | • विद्यावेतन – रु. १०,०००/- (प्रति महिना)<br>• अनुषंगिक लाभ – रु. १२,०००/- (फक्त एकदाच) |

पूर्व प्रशिक्षण संस्थेच्या निवडीकरिता ऑनलाइन विकल्प देण्यासाठी संबंधित लिंकवरून Login करणे आवश्यक आहे. त्यासाठी उमेदवारांनी प्रवेश अर्ज (Application Form) भरताना वापरलेल्या Email ID व Password यांचा वापर करावा. तसेच आपले लॉगीन आयडी व पासवर्ड हे संबंधित उमेदवारांना त्यांनी प्रवेश अर्ज (Application Form) भरताना वापरलेल्या Email ID वर पुनःश्च पाठविण्यात येतील. सबब उमेदवारांनी सदर इमेल व मोबाईल क्रमांक चालू स्थितीत ठेवणे आवश्यक आहे.

संबंधित नामनिर्देशित खाजगी नामांकित प्रशिक्षण संस्थांचे विकल्प देण्याची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली असून सदर विकल्प पोर्टल वर जितक्या संस्था नमूद आहेत त्या सर्वांना उमेदवारांनी पसंतीक्रम/विकल्प (Preference) द्यायचा आहे. सर्व संस्थांना पसंतीक्रम/विकल्प दिल्यानंतर OTP द्वारे सदर पसंतीक्रम/विकल्प सत्यापित (verify) केल्यानंतरच आपले पसंतीक्रम/विकल्प Submit करण्याचा Tab कार्यान्वित होईल. Submit वर click केले असता आपले पसंतीक्रम/विकल्प नोंद होऊन त्याची Acknowledgement Receipt (पोच पावती) तयार होईल. **OTP द्वारे जोपर्यंत आपण विकल्प सत्यापित (verify) करत नाही तोपर्यंत आपले विकल्प अंतिम होणार नाहीत.**

**सदर प्रमाणे प्राप्त झालेले पसंतीक्रम/विकल्प हे अंतिम असून त्यात कोणताही बदल करता येणार नाही**, सबब उमेदवारांना सूचित करण्यात येते की त्यांनी योजनेची निवड अत्यंत काळजीपूर्वक करावी तसेच प्रशिक्षण संस्थांचे विकल्प हे त्यांच्या संदर्भातील उपलब्ध माहिती View Details Tab मधून वाचून त्यानंतरच भरावे.

सदर विकल्प लिंक वर Contact Us या Tab/शीर्षकाखाली सर्व संबधित योजनांचे **संपर्क Email ID दिले** खालीलप्रमाणे उपलब्ध करून देण्यात येत आहेत.

| अ.क्र | योजना | ई-मेल | संपर्क क्र. |
|---|---|---|---|
| १ | GRE/TOEFL/ IELTS/GMAT | gretoefl.trti@gmail.com | ०२० २६३३०८५४ |
| २ | Foreign Language | foreignlang.trti@gmail.com | |

संबंधित खाजगी नामनिर्देशित प्रशिक्षण संस्थांमधील उमेदवारांना त्यांच्या पसंतीक्रमानुसार प्रशिक्षण संस्थांमध्ये प्रवेश दिला जाईल. तसेच उमेदवारांच्या मूळ कागदपत्र पडताळणी अंतीच प्रवेश अंतिम करण्यात येईल, याची उमेदवारांनी नोंद घ्यावी.

(चंचल पाटील)
प्र. आयुक्त
आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे.